The transition of India toward clean energy represents a major transformation in its economic, environmental, and geopolitical landscape. As one of the world's fastest-growing energy consumers, India is increasingly promoting non-fossil fuel energy sources such as solar, wind, hydro, nuclear energy, and green hydrogen to reduce dependence on fossil fuels and achieve long-term energy security and climate commitments. This manuscript examines the geopolitical dimensions of India's clean energy transition by analyzing both its strategic opportunities and emerging challenges. The study highlights how renewable energy expansion enhances India's global climate leadership, strengthens strategic partnerships through initiatives such as the Minerals Security Partnership, and supports regional cooperation in the Indo-Pacific. The paper also evaluates supply chain dependencies associated with India's renewable energy sector. It critically discusses challenges including dependence on imported critical minerals, technological reliance on China, supply chain vulnerabilities, geopolitical competition, policy coordination issues, and energy security concerns during the transition phase. The study argues that India's clean energy transition is not merely an environmental objective but also a strategic geopolitical process shaped by global power dynamics and technological transformation.

Keywords Clean energy · Geopolitics · Non-fossil fuel energy · Renewable energy · Fossil fuel · Climate-induced · Sustainable

1 Introduction

India is undergoing a significant transition from fossil-fuel-based energy to non-fossil-fuel-based energy. This transition is stimulated by its commitment under the Paris Agreement to limit the global temperature rise to 1.5 °C above pre-industrial levels to mitigate the climate-induced catastrophe (UNFCCC). Furthermore, it is also influenced by its energy security concerns and an aim to achieve sustainable development goals of affordable and clean energy, and climate action. Fossil-fuel-based energy sources, such as thermal power, emit carbon, contributing to global warming, which in turn leads to environmental degradation. In contrast, the non-fossil fuel-based energy like nuclear power and the renewables like solar, wind, hydro, and bio-power are cleaner and more sustainable. Moreover, most of this energy has no carbon footprint. Hence, India's transition to clean energy

This Article in Press is shared early to give you faster access to new research. It is citable and carries a permanent DOI. The final edited version will replace it automatically.

Discover Sustainability https://doi.org/10.1007/s43621-026-04496-9

Published online: 08 October 2026

Discover







Department of Physical Education

अभिमानास्पद विजय!

आंतर महाविद्यालयीन मुलांच्या खो-खो स्पर्धेत मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगरच्या मुलांच्या संघाने चुरशीच्या, रंगतदार आणि उत्कंठावर्धक अंतिम सामन्यात नेत्रदीपक विजय मिळवत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले!

संघभावना • जिद्द • मेहनत • शिस्त • उत्कृष्ट खेळ

या सर्वांचा अप्रतिम संगम दाखवत मॉडर्नच्या खेळाडूंनी पुन्हा एकदा आपल्या महाविद्यालयाचे नाव अभिमानाने उंचावले.

सर्व विजेत्या खेळाडू विद्यार्थी, मार्गदर्शक, प्रशिक्षक आणि क्रीडा विभागाचे हार्दिक अभिनंदन!

प्रा. डॉ. निवेदिता ग. एकबोटे

प्राचार्या,

मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर पुणे 5









Department of Physical Education

Outstanding Performance at the Inter-Collegiate Athletics Competition!

The Athlete of Modern College, Shivajinagar, delivered an exceptional performance at the Inter-Collegiate Athletics Competition, showcasing remarkable talent, determination, hard work, and team spirit to bring home a rich haul of medals and make their college proud!

Our talented athletes have made the entire Modern College family proud by winning Gold, Silver, and Bronze medals through their dedication and perseverance.

Individual Medal Achievements
1. Pranjal Bachche – 400m Running – Gold Medal
2. Afan Shaikh – 400m Running – Gold Medal
3. Vedshree Lonari – 400m Running – Silver Medal
4. Bimlesh Dubey – 3000m Steeplechase – Bronze Medal
5. Bimlesh Dubey – 20km Race Walk – Bronze Medal
6. Sangharsha Pandit – 100m Hurdles – Bronze Medal
7. Sai Sashte – 20km Race Walk – Bronze Medal
8. Pranjal Bachche – 800m Running – Gold Medal
9. Vedshree Lonari – 800m Running – Silver Medal
10. Afan Shaikh – 200m Running – Silver Medal
11. Bimlesh Dubey – 21km Run (Men) – Bronze Medal
12. Sneha Patil – 21km Run (Women) – Bronze Medal

Team Relay Achievements
*4 × 100m Relay – Men (Gold Medal)
* Sarthak Belwate
* Prathamesh Holkar
* Vedant Bachche
* Afan Shaikh

*4 × 100m Relay – Women (Gold Medal)
* Sangharsha Pandit
* Pranjal Bachche
* Pooja Kadam
* Vedshree Lonari

*4 × 400m Relay – Men (Gold Medal)
* Sarthak Belwate
* Prathamesh Holkar
* Keshav Orse
* Afan Shaikh

*4 × 400m Relay – Women (Bronze Medal)
* Sangharsha Pandit
* Sneha Patil
* Pooja Kadam
* Sai Sashte

*4 × 100m Mixed Relay (Bronze Medal)
* Prathamesh Holkar
* Vidya Giri
* Sarthak Belwate

Department of Physical Education

HEARTIEST CONGRATULATIONS TO ALL OUR MEDAL WINNERS!

With relentless practice, tremendous hard work, discipline, and an unbreakable spirit, our athletes have brought immense pride and glory to Modern College. Heartiest congratulations to all the medal winners, their coaches, mentors, and the entire Department of Physical Education & Sports for their valuable guidance and support!

Every Effort Counts. Every Experience Matters!

To the athletes who could not achieve their desired results this time, remember that every competition is an opportunity to learn and improve. Stay positive, learn from your experiences, and continue working hard with determination and consistent practice to achieve your medal-winning goals in the upcoming competitions.

Once again, congratulations to all our athletes, and best wishes for continued success in the future! Tradition of Excellence!







Congratulations Dr. Nilam Ingole, Department of English

Heartiest Congratulations to Dr. Nilam Ingole!
On behalf of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5, I extend my heartfelt congratulations to Dr. Nilam Ingole on her valuable contribution to Virus: Annotated for Today's Global Digital Humans (and Aliens), authored by Prof. Jayant V. Narlikar, edited by Sami Ahmad Khan, and published by The MIT Press, USA. Her contribution, "Select Marathi-Language Critical Resources on Jayant V. Narlikar's Science Fiction," is a significant recognition of the rich literary and critical tradition of Marathi Science Fiction. This achievement brings Marathi scholarship to the global academic and literary platform and highlights the importance of regional languages in enriching international literary discourse.
I deeply appreciate her scholarly contribution and congratulate her on this remarkable accomplishment. May she continue to achieve greater heights in research, writing, and academic excellence. Warm wishes and congratulations!

Prof. Dr. Nivedita Ekbote
Principal
Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5



Congratulations Dr. Nilam Ingole, Department of English



CONTENTS

Series Foreword . ix

Foreword . xi
Bodhisattva Chattopadhyay

The Narlikar Effect: Editor's Introduction . xv
Sami Ahmad Khan

Author's Note . xxxiii
Jayant V. Narlikar

Virus . 1
by Jayant V. Narlikar,
annotated for today's global digital humans (and aliens)

"Virus": A Short Story . 159
Jayant V. Narlikar

ESSAYS

Science Fiction in/as Postcolonial Infrastructure: Reading Technology . 177
and Nationhood in Jayant V. Narlikar's *Virus*
Dibyadyuti Roy

Science Fiction, Society, and Silence: The Missing Margins in *Virus* . 191
Priteegandha Naik

The Fiction of Science—and the Science of Fiction: A Conversation . 207
with Jayant V. Narlikar
Jayant V. Narlikar and Sami Ahmad Khan

Select Marathi-Language Critical Resources on . 213
Jayant V. Narlikar's Science Fiction
Compiled by Nilam Ingole

Contributors . 215



Modern Alumni Achievement

धाराऊ...

कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन - मनीष सुरेश शिंदे

२३ ऑक्टोबर २०२६ पासून आपल्या जवळच्या चित्रपटगृहात प्रदर्शित!

धाराऊ... ती गाय नाय... माय हाय!

सांगण्यास अत्यंत आनंद होत आहे की, या चित्रपटासाठी कॉस्ट्यूम डिझायनिंग आपल्याच फॅशन टेक्नॉलॉजी विभागाची विद्यार्थिनी श्रावणी जाधव हिने केले आहे.

तसेच तिने या चित्रपटात कॉस्ट्यूम डिपार्टमेंट हेड म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे.

या प्रोजेक्टसाठी तिला आपल्याच फॅशन टेक्नॉलॉजी विभागातील विद्यार्थिनी उर्वी सुतार हिने संपूर्ण प्रोजेक्टसाठी असिस्ट केले आहे.

श्रावणी, उर्वी आणि तिच्या संपूर्ण टीमचे मन:पूर्वक अभिनंदन आणि 'धाराऊ' टीमला मॉडर्न महाविद्यालयाकडून खूप खूप शुभेच्छा!









Modern Alumni Achievement

इतिहास विभागातील २०२५ च्या batch ची विद्यार्थीनी स्वरूपा मुलिक हि NTA परीक्षा Ph. D. एडमिशन साठी पात्र झाली.

स्वरूपाचे अभिनंदन!

इतिहास विभाग
मॉडर्न कॉलेज
शिवाजीनगर, पुणे

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
Quality higher education for all

UGC - NET June 2026
Scorecard

राष्ट्रीय परीक्षा एजेंसी
National Testing Agency
Excellence in Assessment

Print Close

Roll Number:	MR220203856	Application Number:	260510328465	
Candidate's Name:	SWARUPA SANJAY MULIK			
Mother's Name:	VARSHA SANJAY MULIK			
Father's Name:	SANJAY BABURAO MULIK			
Category:	General	PwD/PwBD*:	No	
Gender:	Female	Date of Birth:	05/08/2003	
Subject:	(006) History			
No. of Candidates in this Subject	Registered:	83209 Appeared:	65846	
Applied on the basis of:	Master's Degree			
Applied for:	ASSISTANT PROFESSOR,JRF (JUNIOR RESEARCH FELLOWSHIP),Ph.D. ONLY			

Paper	Maximum Marks	Marks Obtained	Percentile Score Obtained
Total (Paper – 1 + Paper – 2):	300	162	96.9003432
Total Marks Obtained in Words:	One Hundred Sixty Two Only		
Total Percentile Score Obtained in Words:	Ninety Six point Nine Zero Zero Three Four Three Two Only		
Result:	QUALIFIED FOR ADMISSION TO Ph.D. ONLY		

'*' VI-Visually Impaired, HI- Hearing Impaired, LM-Locomotor Disability, OD-Other Disability

Date of Issue: 28.08.2026



NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING OCTOBER 2026

Author	Title
• DIAL ROB / VIDWANS SHUBHADA	• LEVEL UP लेव्हल अप : चित्त एकाग्र करा, चालढकल करणं थांबवा आणि तुमचं आयुष्य अधिक उंचीवर न्या
• VANDILE SURESH	• UTKRUSHTA CARRIER SHAMBHAR TAKKE HAMI ! उत्कृष्ट करिअर शंभर टक्के हमी !
• GODBOLE ACHYUT / KULKARNI MADHURI	• CAREERISM करिअरझम
• KAHATE ATUL	• A I CHALAT KAS ! TANTRANGYANCHA SAKHOL PARICHAY A I चालतं कसं ! A I तंत्रज्ञानाचा सखोल परिचय
• KAHATE ATUL	• A I CHA TUFAN NURAL NETWORK TE DEEPSIC ए आय च तुफान न्यूरल नेटवर्क ते डीपसिक
• RANJANKAR TUSHAR / JAGTAP NAVNATH	• MOBILE VYASANMUKTI मोबाईल व्यसनमुक्ती
• PATIL VISHWAS	• CHANDANACHA SANGAVA चंदनाचा सांगावा
• SIRAJ NADIM /SALAVI PRASAD	• SECRET NOTES FROM IRAN इराणच्या गुप्त नोंदी
• BORKAR B. B. / DHERE R. C.	• BORKARANCHI PREMKAVITA बोरकरांची प्रेमकविता
• BHAT SURESH	• ZANZAWAT झांझावात
• PATHAN SHAFI	• TUKARAM : TUKARAM MUNDHE
• GHADAGE RAJENDRA	• RAJDHURANDHAR TARARANI राजधुरंधर ताराराणी
• BERNARD /GRZIMEK MICHAEL/MADGULKAR	• SINHANCHYA DESHAT सिंहांच्या देशात
• DESHPANDE P. L .	• BATATYACHI CHAL बटाट्याची चाळ
• SANT PRAKASH NARAYAN	• SHARADA SANGEET शारदा संगीत
• KHANDEKAR V. S.	• AMRUTVEL अमृतवेल
• KARVE IRAVATI	• UGANT यूगांत
• BAGUL BABURAO	• JEVHA MI JAAT CHORALI जेव्हा मी जात चोरली
• NAARALIKAR JAYANT	• SURYACHA PRAKOP सूर्याचा प्रकोप
• SAMAR	• RADHA BHAG 2 राधा भाग 2
• SAMAR	• RADHA BHAG 1 राधा भाग 1
• SAMAR	• URMILA : EKA ADNYAT EKANTACHA PRAVAS उर्मिला : एका अज्ञात एकांताचा प्रवास
• SAMAR	• PARAVATI : TAPSWINI, VIDUSHI, SHIVPRIYA पार्वती : तपस्विनी, विदुषी, शिवप्रिया

News Paper Clippings : October 2026



Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf]*

Clipping is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

महाराष्ट्र टाइम्स

लोकसत्ता

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

लोकमत

TOI

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into ***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous .***

hindustantimes



सामना

प्रभात

केसरी

News Paper Clippings During October 2026

Section: Education

प्रभात
www.dainikprabhat.com

प्रथम सत्र परीक्षा शुल्कमाफीचे निर्देश!

दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा निर्णय

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १ - राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण आर्थिक अडचणींमुळे अपूर्ण राहू नये, यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने परीक्षा शुल्क माफ करण्यासोबतच त्यांना विविध प्रकारे मदत पुरविण्यासाठी विद्यापीठ स्तरावर विशेष टास्क फोर्स स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. नोव्हेंबर-डिसेंबरधील प्रथम सत्र परीक्षांसाठी दुष्काळग्रस्त भागातील सर्व पात्र विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेऊ नये, असे स्पष्ट निर्देश राज्यातील सर्व विद्यापीठांसह महाविद्यालयांना दिले आहेत.



उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या ऑनलाइन बैठकीत हे निर्देश देण्यात आले. मदत व पुनर्वसन विभागाने राज्यातील ३४ जिल्ह्यांतील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर केली आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित आढावा बैठकीस विभागाचे अप्पर मुख्य सचिव वेणूगोपाल रेड्डी आणि उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, सर्व सार्वजनिक विद्यापीठांचे कुलगुरू, प्र- कुलगुरू, कुलसचिव व प्राचार्य उपस्थित होते.

केवळ शासन निर्णयाची अंमलबजावणी न करता उच्च शिक्षण क्षेत्राने एका कुटुंबासारखे एकत्र येऊन परिस्थितीचा सामना केला पाहिजे. सक्षम महाविद्यालयांनी दुष्काळग्रस्त भागातील संस्था व विद्यार्थ्यांना मदत करावी, असे आवाहन मंत्री पाटील यांनी केले. या उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी उच्च शिक्षण संचालनालयात स्वतंत्र कक्ष आणि प्रत्येक विद्यापीठात टास्क फोर्स कार्यरत असेल. या सर्व कामांचा दर १५ दिवसांनी आढावा घेणार असून, दुष्काळामुळे एकाही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबणार नाही, असेही ते म्हणाले.

Pune City Edition
Oct 02, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

News Paper Clippings During October 2026

Section: Education

प्रभात

सीईटी डिसेंबरऐवजी बारावीच्या परीक्षेनंतरच!

ग्रामीण विद्यार्थ्यांच्या विरोधानंतर उच्च व तंत्रशिक्षण विभागाची माघार

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ११ - अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेशासाठी घेतली जाणारी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा अर्थात सीईटी यंदापासून बारावी परीक्षेपूर्वी म्हणजेच डिसेंबर व परीक्षेनंतर एप्रिल अशा दोन टप्प्यांत घेण्याचा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला होता. मात्र, त्यास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा वाढता विरोध आणि अभ्यासक्रम पूर्ण होण्यातील अडचणी लक्षात घेऊन हा निर्णय मागे घेतल्याची माहिती समोर आली आहे. आगामी शैक्षणिक वर्षापासून दोन्ही सीईटी परीक्षा मार्च ते मे या कालावधीतच होणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

राष्ट्रीय पातळीवरील जेईईच्या धर्तीवर राज्य सीईटी सेलकडून शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून पहिली सीईटी डिसेंबर २०२६ मध्ये आणि दुसरी सीईटी एप्रिल २०२७ मध्ये घेण्याचे नियोजन सुरू होते. मात्र, या निर्णयाविरोधात धाराशिव, नंदुरबार, चंद्रपूर यांसारख्या ग्रामीण भागांतून तीव्र पडसाद उमटले. ग्रामीण भागातील बहुतांश विद्यार्थ्यांचा बारावीचा अभ्यासक्रम डिसेंबरपर्यंत पूर्ण होत नाही. अशा स्थितीत आधीच परीक्षा घेतल्यास विद्यार्थ्यांवर मानसिक ताण येईल, अशी भूमिका पालक, शिक्षक व समुपदेशकांनी घेतली होती. शहरी भागांचा विचार करून घेतलेले निर्णय ग्रामीण विद्यार्थ्यांचे खच्चीकरण करणारे असल्याची टीकाही करण्यात आली.

हा विरोध गांभीर्याने घेत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शिक्षणतज्ज्ञांचे अभिप्राय मागवले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून डिसेंबरमधील परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. नव्या नियोजनानुसार दोन्ही सीईटी परीक्षा मार्च किंवा एप्रिल महिन्यातच घेतल्या जातील. दोन्ही परीक्षांच्या कालावधीत सुमारे चार आठवड्यांचे अंतर राखले जाईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी दिली आहे.

चालू वर्षाप्रमाणेच आगामी वर्षातही दोन संधींपैकी ज्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळतील, तेच गुण अंतिम प्रवेशासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. या परीक्षांचे तात्पुरते आणि सुधारित वेळापत्रक पुढील आठवडाभरात जाहीर होण्याची शक्यता आहे. यामुळे ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

Pune City Edition
Oct 12, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

News Paper Clippings During October 2026

Section: Education

पुनरी

नववी ते बारावीसाठी एआय अभ्यासक्रम

शालेय विद्यार्थ्यांसाठी 'एनसीईआरटी'चा २० तासांचा नवा उपक्रम

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंगने (एनसीईआरटी) इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'कॉम्प्युटेशनल थिंकिंग' (सीटी) आणि 'आर्टिफिशिअल इंटेलिजन्स' (एआय) या विषयांवर आधारित २० तासांचा विशेष अभ्यासक्रम सुरू केला आहे. आयआयटी मद्रास, आयआयटी जोधपूर आणि एनसीईआरटीच्या तज्ज्ञांनी हा कृती आधारित अभ्यासक्रम विकसित केला असून विद्यार्थ्यांना एआयचे स्वरूप, फायदे-तोटे आणि सुरक्षित वापराचे धडे देणे हा यामागील मुख्य उद्देश आहे.



डिजिटल सुरक्षिततेचा इशारा

एनसीईआरटीने विद्यार्थ्यांना स्पष्ट सूचना दिली आहे की, कोणत्याही एआय टूलमध्ये आधार क्रमांक, पॅन कार्ड, पासवर्ड, ओटीपी किंवा खासगी कागदपत्रे यांसारखा संवेदनशील डेटा टाकू नये. तंत्रज्ञान वापरताना मानवी निर्णयक्षमता, सर्जनशीलता आणि नैतिक जबाबदारी केंद्रस्थानी राहिली पाहिजे, यावर भर देण्यात आला आहे.

सर्वसमावेशक शिक्षण पद्धती

हा अभ्यासक्रम डिजिटल उपकरणे उपलब्ध नसतानाही शिकवला जाऊ शकतो, त्यामुळे देशातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येईल. यापूर्वी सीबीएसईने इयत्ता तिसरी ते आठवीसाठी एआयचा पायाभूत अभ्यासक्रम सुरू केला होता. आता माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील या नव्या अभ्यासक्रमामुळे शालेय शिक्षणात एआय तंत्रज्ञानाची सुरक्षित व पद्धतशीर पायाभरणी होण्यास मोठी मदत होणार आहे.

एनसीईआरटीने आयआयटी मद्रास व जोधपूरच्या सहकार्याने इयत्ता नववी ते बारावीसाठी २० तासांचा एआय अभ्यासक्रम आणला आहे.

हा अभ्यासक्रम एकूण ५ युनिटस्मध्ये विभागलेला असून तो प्रामुख्याने प्रत्यक्ष कृती आणि अनुभवांवर आधारित आहे.

'व्हेन एआय गेटस् इट रॉंग' या घटकाद्वारे डीपफेक, चुकीची माहिती आणि सत्य पडताळणीची पद्धत शिकवली जाईल.

विद्यार्थ्यांच्या डिजिटल सुरक्षेसाठी आधार, पॅन, पासवर्ड यांसारखी संवेदनशील माहिती एआय साधनांमध्ये न देण्याचा इशारा देण्यात आला आहे.

अभ्यासक्रमाचे स्वरूप आणि ५ युनिटस्ची विभागणी

विद्यार्थ्यांना एआय सिस्टीमवर आंधळेपणाने अवलंबून न राहता तिचे योग्य मूल्यमापन करता यावे, यासाठी ५ युनिटस् तयार करण्यात आली आहेत.

- **दैनंदिन जीवनातील एआय :** स्मार्टफोनमधील प्रेडिक्टिव्ह कीबोर्ड आणि म्युझिक ॲप्समधील शिफारशी यांसारख्या रोजच्या उदाहरणांवरून एआय समजावणे.
- **मशिन लर्निंग प्रक्रिया :** कॉम्प्युटर उदाहरणांवरून कसे शिकतात, इमेज क्लासिफायर्सचे प्रशिक्षण आणि डेटाचा एआयच्या कार्यक्षमतेवर होणारा परिणाम.
- **व्हेन एआय गेटस् इट रॉंग :** चुकीची माहिती, डीपफेक आणि एआयच्या चुका समजून घेणे तसेच माहिती पडताळण्यासाठी ५ पायऱ्यांची पद्धत शिकणे.
- **डेटा गोपनीयता व डिजिटल सुरक्षा :** भारताच्या डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन कायदा २०२३ ची ओळख आणि वापरल्या जाणाऱ्या ॲप्सच्या प्रायव्हसी पॉलिसीचे विश्लेषण.
- **प्रॉम्प्ट रायटिंग व आऊटपुट पडताळणी :** प्रभावी प्रॉम्प्ट तयार करणे, एआयने दिलेल्या उत्तरांमधील त्रुटी दुरुस्त करणे आणि स्वतःच्या विचारक्षमतेला पर्याय न मानता एआयला केवळ सहायक म्हणून वापरणे.

Pune Edition
Oct 26, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com

News Paper Clippings During October 2026

Section: Education

पुढारी

दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ

राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांचे विभागीय सचिवांना स्पष्ट निर्देश

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर दहावी आणि बारावीच्या परीक्षांसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाल्यानंतर मंडळाने संबंधित भागांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची घोषणा केली आहे. ही माफी फक्त नियमित विद्यार्थ्यांपुरती मर्यादित नसून, दुष्काळग्रस्त भागातील पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांनाही लागू होणार आहे. तसे निर्देशच राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी दिले आहेत.

डॉ. माळी यांनी दिलेल्या निर्देशानुसार, दुष्काळ जाहीर होण्यापूर्वीच मंडळाने दहावी व बारावीच्या परीक्षांसाठी ऑनलाइन अर्ज नोंदणी प्रक्रिया सुरू केली होती. ही प्रक्रिया अद्याप सुरूच आहे. अर्ज भरताना अनेक शाळांनी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्कही गोळा केले. मात्र, यापैकी काही शाळांनी गोळा केलेले शुल्क अद्याप मंडळाकडे जमा केलेले नाही. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना अन्याय होऊ नये म्हणून मंडळाने स्पष्ट निर्देश दिले आहेत.

ज्या विद्यार्थ्यांचे शुल्क शाळांनी मंडळाकडे जमा केलेले नाही, त्यांचे शुल्क शाळांनी स्वतःच्या स्तरावरून तत्काळ परत करणे बंधनकारक आहे. मंडळाने याबाबत शाळांना औपचारिक आदेश दिले असून, शुल्काची संपूर्ण जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांवर टाकली आहे. मुख्याध्यापकांनी ही प्रक्रिया पारदर्शकपणे आणि तातडीने पूर्ण करावी, असे मंडळाने स्पष्ट केले आहे.

राज्य मंडळाने शाळांना सूचना केल्या आहेत की, शुल्क परत करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित नोंदी ठेवाव्यात आणि आवश्यक तेव्हा मंडळाला अहवाल सादर करावा. विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेशी संपर्क साधून शुल्क परत मिळण्याबाबत चौकशी करावी, असे आवाहनही केले आहे. या निर्णयामुळे दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी करताना आर्थिक चिंता कमी होईल आणि शिक्षणाच्या प्रवाहात अडथळा येणार नाही, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

विद्यार्थी आणि पालकांना मोठा दिलासा

दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी शुल्कमाफीची योजना लागू झाल्याने शाळांना गोळा केलेले शुल्क परत करणे भाग पडले आहे. मंडळाच्या या निर्णयाने विद्यार्थी आणि पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काचा भार कमी होणार आहे. पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांनाही या योजनेचा लाभ मिळणार असल्याने अधिकाधिक विद्यार्थी लाभार्थी ठरण्याची शक्यता आहे.

Pune Edition
Oct 27, 2026 Page No. 07
Powered by: erelego.com

News Paper Clippings During October 2026

Section: Education

नवराष्ट्र
Pune | 27 October 2026 | Page 1

सर्व अभ्यासक्रमांना वर्षातून दोनदा सीईटी

१९ व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश : चंद्रकांत पाटील यांची माहिती

▶ मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. महाराष्ट्र राज्याने, प्रवेश परीक्षा आयोजित करणाऱ्या सर्व १९ अभ्यासक्रमांसाठी वर्षातून दोनदा सामायिक प्रवेश परीक्षा देण्याची सुविधा विस्तारित करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. आगामी शैक्षणिक वर्ष २०२७-२८ च्या प्रवेश सत्रापासून सुरू होणाऱ्या या सुविधेच्या विस्ताराचा उद्देश, विद्यार्थ्यांना सर्व सीईटी परीक्षांमधील त्यांचे गुण सुधारण्याची अतिरिक्त संधी देणे हा आहे; जशी ही सुविधा गेल्या वर्षी दोन सीईटी परीक्षांसाठी उपलब्ध होती. महाराष्ट्र सामायिक प्रवेश परीक्षा सेलने गेल्या वर्षी एमएचटी-सीईटी आणि एमबीए सीईटीसाठी दोन सीईटी परीक्षांची सुविधा सुरू केली होती - एक मार्चमध्ये आणि दुसरी मेमध्ये. आता ही सुविधा सर्व सीईटी परीक्षांसाठी विस्तारित केली जाईल, असे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठात क्वांटम प्रोग्रामिंगवरील आयबीएम क्वांटमच्या 'क्विस्किट फॉल फेस्ट २०२६ उद्घाटन करताना सांगितले. पाटील म्हणाले की, या निर्णयामुळे इच्छुकांना त्यांचे सीईटी गुण सुधारण्याची आणखी एक संधी मिळेल. सर्व सीईटी परीक्षांचे आयोजन प्रमाणित करण्यासाठी सरकार सविस्तर परीक्षा नियमावलीवर काम करत आहे.



सीईटीसाठी किमान गुण वाढवण्याचा विचार

दरम्यान, एमएचटी-सीईटीद्वारे राज्यात होणाऱ्या अभियांत्रिकी प्रवेशांसाठी, इयत्ता १२वीच्या बोर्ड परीक्षेत आवश्यक असलेले किमान एकूण गुण वाढवण्याचा सरकार विचार करत आहे. सध्याची पात्रता अट इयत्ता १२वीच्या बोर्ड परीक्षेत किमान ४५% गुण ही आहे. 'तथापि, या प्रकरणाची तपासणी करण्यासाठी नेमलेली समिती आपला अहवाल सादर केल्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल. त्यांनी प्रस्तावित केलेले बदल शैक्षणिक वर्ष २०२८-२९ पासून लागू होतील, ज्यामुळे विद्यार्थ्यांना सीईटीचा अभ्यास करताना बोर्ड परीक्षेची तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल,' असे पाटील म्हणाले.

epaper.navarashtra.com

News Paper Clippings During October 2026

Section: Education

लोकमत

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्याबाबतही सरकार सकारात्मक : मंत्री चंद्रकांत पाटील

तात्काळ उपाययोजना करण्यावरही भर; कमवा-शिका योजनेच्या माध्यमातून आर्थिक मदत

लोकमत फॉलोअप

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : दुष्काळग्रस्त भागांतील विद्यार्थ्यांना यंदा परीक्षा शुल्क माफ करण्यात आले आहे. शैक्षणिक शुल्क माफ करण्याबाबतही सरकार सकारात्मक विचार करत आहे. तसेच भोजन, निवास व्यवस्था आणि कमवा-शिका योजनेच्या माध्यमातून अधिकाधिक विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी उच्च शिक्षण विभागाने पुढाकार घेतला आहे. याबाबतचा प्रस्ताव सरकारपुढे ठेवण्यात येईल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

दरम्यान, राज्यातील दुष्काळी स्थितीमुळे दुष्काळग्रस्त भागांतून उच्च शिक्षणासाठी शहरात आलेल्या विद्यार्थ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. शेतीचे उत्पन्न घटल्याने घरून पैसे मिळणे कठीण झाले आहे. परिणामी शहरातील निवास, भोजन आणि शिक्षणाचा खर्च भागवताना विद्यार्थ्यांची दमछाक होत आहे. ही बाब विचारात घेऊन राज्य सरकारने परीक्षा शुल्क माफीसह ठोस पावले उचलावे. यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी विद्यार्थी आणि सामाजिक संस्था-संघटनांकडून होत आहे. अशी मागणी होत असल्याचे वृत्त दैनिक 'लोकमत'ने प्रसिद्ध केले होते. त्याची दखल घेत उच्च शिक्षण मंत्र्यांनी ठोस उपाययोजना करत असल्याचे जाहीर केले आहे.

विविध पदवी अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या सुमारे ८७ टक्के विद्यार्थ्यांना सरकारच्या विविध शिष्यवृत्ती योजनांच्या माध्यमातून आर्थिक मदत दिली जाते. त्याचप्रमाणे राज्यात मुलींचे शैक्षणिक आणि परीक्षा शुल्क माफ केले आहे. सध्या परीक्षा शुल्क माफ केले आहे. मात्र, वसतिगृह आणि मेसचे शुल्क भरण्याबाबत विद्यार्थ्यांना अडचणी येत आहेत. शुल्कमाफीचा निर्णय घेण्याबाबतची मागणी विविध घटकांकडूनही करण्यात येत आहे.



संग्रहिक छायाचित्र

शुल्कवाढ न देण्याबाबतही विचार!

व्यावसायिक महाविद्यालयांचे शुल्क निश्चितीबाबत शुल्क नियामक प्राधिकरण (एफआरए) यांना स्वतंत्र अधिकार आहेत. सध्या महाविद्यालयांकडून आगामी वर्षाच्या शुल्कवाढीचे प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. हे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालयांना शुल्कवाढ न देण्याबाबत प्राधिकरणामार्फत कार्यवाही करण्याचा विचार केला जाईल, असेही मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.



दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना हवे अन्नछत्र, वसतिगृह शुल्कमाफी

> राज्य सरकार दुष्काळग्रस्त भागांतील विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शैक्षणिक शुल्क, वसतिगृह आणि भोजनालयाचे शुल्क भरण्यात अडचणी येऊ नयेत या दृष्टीने राज्य सरकार शुल्कमाफीसह विविध पर्यायांचा विचार करीत आहे. दुष्काळाची परिस्थिती पाहून योग्य निर्णय घेण्यात येईल.
>
> **चंद्रकांत पाटील,** उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

Pune Main
Page No. 9 Oct 27, 2026
Powered by: erelego.com

News Paper Clippings During October 2026

Section: Education

लोकमत

एज्यु कनेक्ट

पुणे, मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ ७

epaper.lokmat.com

आज जागतिक अर्थव्यवस्था आणि शिक्षण क्षेत्र एका अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक वळणावर उभे आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), रोबोटिक्स, ऑटोमेशन आणि हरित तंत्रज्ञान यांसारख्या आधुनिक घटकांमुळे जगातील प्रत्येक उद्योगाचे स्वरूप मुळापासून बदलत आहे. पूर्वीची औद्योगिक क्रांती ही प्रामुख्याने शारीरिक कष्टाच्या कामांचे ऑटोमेशन करणारी होती; परंतु आजची 'डिजिटल व एआय क्रांती' थेट मानवी बुद्धिमत्ता, विश्लेषणात्मक विचार आणि प्रशासकीय निर्णयप्रक्रियेला स्पर्श करत आहे.



एआय इमेज

एआय विश्व

'एआय'च्या युगात रोजगाराचे नवे भविष्य आणि कौशल्यांचा महामार्ग



डॉ. पराग काळकर
प्र-कुलगुरू, पुणे विद्यापीठ

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या 'फ्युचर ऑफ जॉब्स' अहवालानुसार, २०२५ ते २०३० या पाच वर्षांच्या कालावधीत जागतिक श्रमबाजारामध्ये सुमारे २२ टक्के संरचनात्मक उलथापालथ पाहायला मिळेल. या काळात तंत्रज्ञानाचा विस्तार आणि नवीन गरजांमुळे जगभरात तब्बल १७ कोटी नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतील. त्याच वेळी, ऑटोमेशन आणि जुन्या कार्यपद्धतींमुळे ९.२ कोटी पारंपरिक नोकऱ्या विस्थापित किंवा कालबाह्य होतील. याचाच अर्थ, एकंदरीत रोजगारात ७.८ कोटींची निव्वळ वाढ होणार असली, तरी या नव्या संधींचा फायदा उठवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांचे आव्हान मोठे आहे.

कौशल्यांना महत्त्व

एक शिक्षणतज्ज्ञ म्हणून मला प्रामुख्याने जाणवणारी गोष्ट म्हणजे - आता केवळ कागदी पदवी तुम्हाला उत्तम रोजगाराची हमी देऊ शकत नाही. जागतिक पातळीवर 'स्किल-बेस्ड हायरिंग' ही संकल्पना वेगाने रुजत आहे. कंपन्या आणि उद्योग आता उमेदवाराच्या सीव्हीवर असणाऱ्या पदवीपेक्षा त्याच्याकडे असणारी प्रत्यक्ष कौशल्ये, काम करण्याची क्षमता आणि नवनवीन गोष्टी शिकण्याची तयारीला सर्वाधिक प्राधान्य देत आहेत.

संशोधनानुसार, २०३० पर्यंत कामगारांच्या मूळ कौशल्यसंचामधील तब्बल ३९ टक्के कौशल्ये बदललेली असतील किंवा कालबाह्य ठरतील. आज कार्यरत असलेल्या १०० पैकी ५९ कर्मचाऱ्यांना (सुमारे ६० टक्के) येत्या पाच वर्षांत री-स्किलिंग किंवा अप-स्किलिंग कराचे लागणार आहे. उद्योजकांच्या मते, व्यवसायाच्या विस्तारात आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यात 'योग्य कौशल्यांचा अभाव' हा ६३ टक्के कंपन्यांसमोर सर्वांत मोठा अडथळा ठरत आहे.

नव्या संधींची शिखरे आणि कालबाह्य होणारे क्षेत्र

बदलत्या काळात रोजगाराच्या संधींचे स्वरूप कसे असेल, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

१ वेगाने वाढणारी क्षेत्रे : एआय व डेटा सायन्स : आर्टिफिशियल इंटेलिजन्स स्पेशलिस्ट, बिग डेटा ॲनालिस्ट, डेटा इंजिनिअर आणि सायबर सिक्युरिटी तज्ज्ञ यांना आगामी काळात अनन्यसाधारण मागणी असेल.

ग्रीन इकॉनॉमी (हरित क्षेत्र) : हवामान बदलाचे आव्हान आणि 'नेट-झिरो' उद्दिष्टांमुळे नूतनीकरणक्षम ऊर्जा इंजिनिअर, ईएसजी सल्लागार आणि पर्यावरणतज्ज्ञांची गरज मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे.

केअर व पायाभूत अर्थव्यवस्था : वाढत्या वयोवृद्ध लोकसंख्येमुळे आरोग्य सेवा, परिचारिका, शिक्षण, लॉजिस्टिक आणि शेती या पारंपरिक परंतु मूलभूत क्षेत्रांमध्ये प्रत्यक्ष रोजगाराचे प्रमाण मोठे राहील.

२ घट होणारी क्षेत्रे : दैनंदिन कारकून पद्धतीची कामे, डेटा एंट्री, बँक टेलर, कॅशिअर आणि टपाल सेवा यांमधील नोकऱ्या ऑटोमेशनमुळे कमी होत आहेत. तसेच, जनरेटिव्ह एआयच्या विकासामुळे प्राथमिक स्तरावरील ग्राफिक डिझायनिंग, रूटीन कंटेंट रायटिंग आणि मूलभूत ग्राहक सेवा यांसारख्या कामांवरही परिणाम होत आहे.

सारांश व शैक्षणिक संस्थांची जबाबदारी

भविष्यातील या बदलांचे स्वागत करण्यासाठी आपल्या शैक्षणिक संस्था, विद्यापीठे आणि उद्योग जगताने एकत्र येण्याची गरज आहे.



केवळ पारंपरिक अभ्यासक्रम शिकवून चालणार नाही, तर विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक ज्ञान, एआय साक्षरता आणि उद्योगधंद्यांशी थेट संपर्क उपलब्ध करून दिला पाहिजे. विद्यार्थी आणि तरुण मित्रांना माझी एकच सांगणे आहे - 'एआय'ला तुमचा शत्रू मानू नका, तर त्याला तुमचा सक्षम सहकारी बनवा! जे तरुण स्वतःला सतत अपडेट ठेवतील, नवनवीन कौशल्ये शिकतील आणि मानवी संवेदनशीलता जपत तंत्रज्ञानाचा वापर करतील, त्यांच्यासाठी भविष्यातील जग हे अफाट संधींचे माहेरघर ठरेल.

'एजेंटिक एआय' आणि कामाच्या पद्धतीतील क्रांती

आज आपण केवळ 'चॅटबॉट'च्या पुढे जाऊन 'एजेंटिक एआय'च्या युगात प्रवेश करत आहोत. पूर्वीचे एआय सॉफ्टवेअर फक्त दिलेल्या प्रश्नांचे उत्तर देत असे; परंतु 'एजेंटिक एआय' स्वतःहून एखाद्या उद्दिष्टाचा पाठपुरावा करू शकते.

उदा. शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया, बँक कर्ज प्रक्रिया किंवा कॉर्पोरेट प्रशासनात एआय एजंट अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी करणे, अर्जांचे गुणोत्तर ठरवणे आणि पुढील प्रक्रिया आपोआप पूर्ण करणे अशी कामे करत आहेत. यामुळे मानवी कर्मचाऱ्यांना क्लिष्ट आणि वेळखाऊ कारकुनी कामांतून मुक्ती मिळून, अधिक संवेदनशील आणि धोरणात्मक निर्णय घेण्यावर लक्ष केंद्रित करता येत आहे.

भवितव्यासाठी आवश्यक ५ प्रमुख कौशल्ये

भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आणि नोकरदारांनी खालील कौशल्यांवर भर दिला पाहिजे:

१. विश्लेषणात्मक व सर्जनशील विचार : एआयने दिलेली माहिती योग्य की अयोग्य, हे पारखण्यासाठी मानवी विश्लेषणाची गरज राहील.

२. एआय व डिजिटल साक्षरता : एआय टूल्स आणि डेटा सायन्सचा आपल्या क्षेत्रात कसा वापर करावा, याचे ज्ञान असणे अनिवार्य आहे.

३. अनुकूलता व लवचिकता : वेगाने बदलणाऱ्या वातावरणात स्वतःला जुळवून घेण्याची क्षमता.

४. सतत शिकण्याची वृत्ती : शिक्षण कधीही थांबता नाही; आयुष्यभर नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची सवय लावून घेतली पाहिजे.

५. भावनिक बुद्धिमत्ता व नेतृत्वगुण : मानवी संवेदना, सहानुभूती-सांघिक नेतृत्वास एआय मानवाची जागा घेऊ शकत नाही.

News Paper Clippings During October 2026

Section: Education

उच्च शिक्षण संस्थांचे आता निष्पत्तीआधारित 'नॅक' मूल्यांकन

'नॅक'च्या कार्यकारी परिषदेचे अध्यक्ष प्रा. नागेश्वर राव यांची माहिती

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : 'देशातील उच्च शिक्षण संस्थांना 'नॅक' मूल्यांकन बंधनकारक असूनही आतापर्यंत देशातील केवळ १६ टक्के महाविद्यालये आणि ४० टक्के विद्यापीठांचेच मूल्यांकन झाले आहे. उर्वरित शिक्षण संस्थांना प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी मूल्यांकन प्रक्रिया अधिक सुलभ आणि वेगवान करून नवी रचना लागू करण्यात येत आहे. आता विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष यश, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी अशा निष्पत्ती आधारित पद्धतीने मूल्यमापन केले जाणार आहे,' अशी माहिती राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेच्या (नॅक) कार्यकारी परिषदेचे अध्यक्ष प्रा. नागेश्वर राव यांनी दिली.

सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठातर्फे आयोजित आशिया-पॅसिफिक गुणवत्ता नेटवर्क (एपीक्यूएन) शैक्षणिक परिषदेच्या उद्घाटनावेळी डॉ. राव बोलत होते. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, 'सिंबायोसिस'चे संस्थापक-अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार, 'एपीक्यूएन'च्या अध्यक्षा डॉ. गॅलिना मोटोव्हा, विद्यापीठाच्या कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. रामकृष्णन रमण या वेळी उपस्थित होते.

डॉ. राव म्हणाले, 'एक विद्या एक देश धोरणांतर्गत केंद्रीय माहितीचा वापर करून 'नॅक' मूल्यांकन प्रक्रिया अधिक पारदर्शक, विश्वासार्ह करण्यात आली आहे. शैक्षणिक संस्थांचे मूल्यांकन केवळ पायाभूत सुविधांवर नव्हे, तर प्रत्यक्ष शैक्षणिक परिणामांवर आधारित असले पाहिजे. पूर्वीच्या प्रक्रियेत ६० टक्के भर संस्थांमधील भौतिक सुविधा आणि पायाभूत घटकांवर होता. मात्र, मोठे परिसर आणि अत्याधुनिक सुविधा म्हणजेच दर्जेदार शिक्षण असे नाही. विद्यार्थ्यांची कामगिरी हा शिक्षणाच्या गुणवत्तेचा खरा निकष आहे. विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता, कौशल्य, जीवनातील सकारात्मक बदल अशा प्रश्नांच्या आधारे मूल्यांकन झाले पाहिजे. संस्थांनी संगणकीय शिक्षण, कौशल्यविकास आणि प्रत्यक्ष कामातून प्रशिक्षण देणाऱ्या योजनांचा प्रभावी वापर केला पाहिजे. उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सातत्यपूर्ण सुधारणा आवश्यक आहेत.'

विद्यार्थी आणि त्यांचे भविष्य शिक्षणाच्या केंद्रस्थानी असले पाहिजे. विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना ज्ञान, व्यावहारिक कौशल्ये आणि स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता दिली पाहिजे. त्यामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षकांना सातत्याने नवनवीन ज्ञान आत्मसात करण्यासाठी आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी, विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहकार्यही महत्त्वाचे आहे.

- **चंद्रकांत पाटील**, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री

Loksatta 31.10.2026

News Paper Clippings During October 2026

Section: Research

फ्रान्सिस हॅल्झेन यांना भौतिकशास्त्राचे नोबेल

एपी, स्टॉकहोम

फ्रान्सिस हॅल्झेन यांना मंगळवारी भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार जाहीर झाला. 'आइसक्यूब न्युट्रिनो ऑब्झर्वेटरी'मधील योगदान आणि खगोलभौतिकीय उत्पत्तीच्या उच्च ऊर्जा न्युट्रिनोच्या शोधासाठी हा पुरस्कार जाहीर झाला.

''फ्रान्सिस हॅल्झेन यांनी आपल्याला एक खूप चांगले उपकरण दिले असून, संशोधक आणि अभियंत्यांच्या आंतरराष्ट्रीय टीमचे नेतृत्वही केले आहे. त्यांच्या चिकाटीने आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाने खगोलशास्त्राचा नवा प्रकार समोर आला आहे,'' असे मत भौतिकशास्त्रासाठीच्या नोबेल पुरस्कार समितीचे अध्यक्ष मार्क पीअर्स यांनी व्यक्त केले. हॅल्झेन यांनी समितीबरोबर फोनवरून संवाद साधला. ''नोबेल पुरस्कारासाठी माझ्या नावाची घोषणा अनपेक्षित होती. मला अजिबातच त्याची अपेक्षा नव्हती,'' असे हॅल्झेन म्हणाले. हॅल्झेन हे मूळचे बेल्जियमचे असून, सध्या अमेरिकेतील विस्कॉन्सिन मॅडिसन विद्यापीठाशी संलग्न आहेत.

गेल्या वर्षी भौतिकशास्त्रातील नोबेल 'क्वांटम टनेलिंग'वरील संशोधनासाठी तीन शास्त्रज्ञांना जाहीर झाले होते.

हॅल्झेन यांनी काय केले?

शास्त्रज्ञ ज्या कणांना विश्वाचे 'संदेशवाहक' मानतात; अशा न्यूट्रिनोच्या एका दुर्मीळ गटाचा हॅल्झेन यांनी अभ्यास केला. विश्वाची उत्पत्ती कशी झाली, याचे संकेत हे कण देतात. दक्षिण ध्रुवावरील न्यूट्रिनोबाबतचे त्यांचे संशोधन १९८०च्या दशकापासून सुरू आहे.

लो

अतिसूक्ष्म कॉस्मिक कणांचे रहस्य उलगडल्याने जगाची उत्क्रांती कशी झाली याचे धागेदोरे सापडू शकतात, असे शास्त्रज्ञांना वाटते.



'आइसक्यूब न्युट्रिनो ऑब्झर्वेटरी' काय आहे?

- ही एक अंटार्क्टिकामधील संशोधन संस्था आहे. या संस्थेमधील विस्कॉन्सिन मॅडिसन विद्यापीठ ही प्रमुख संस्था आहे. न्यूट्रिनो हे सूक्ष्म कण असतात. त्यांचे वस्तुमानही अतिशय कमी असते.
- हे कण सगळीकडे असतात. सूर्यासारख्या ताऱ्यामधून ते मोठ्या प्रमाणावर बाहेर पडतात आणि आपल्या शरीरातून सेकंदाला अब्जावधी असे कण आरपार होतात. हे कण दिसत नाहीत.
- हे कण जेव्हा कशावर तरी आदळतात, त्या वेळी जो प्रकाश अथवा भारित कण तयार होतात, त्यांचा अभ्यास करून शास्त्रज्ञ या कणांबाबत अनुमान काढतात.

Loksatta 7.10.2026

News Paper Clippings During October 2026

Section: Research

पुढारी

पुढारी ANCHOR

रेणूच्या 'मिरर इमेज'चे शंभर वर्षे जुने कोडे उलगडणाऱ्यांना नोबेल

फ्रान्सच्या हेन्री कागन, जपानच्या केन्सो सोई यांच्या संशोधनाचा गौरव

- काही रेणूंची दोन रूपे असतानाही सजीवांमध्ये एकाच रूपाचे वर्चस्व का? याचा उलगडा
- विशिष्ट 'मिरर इमेज' रेणू अचूकपणे तयार करण्याचा मार्ग खुला झाल्याने औषधनिर्मिती झाली सुलभ

स्टॉकहोम : वृत्तसंस्था

रेणूच्या 'मिरर इमेज'चे शंभर वर्षे जुने कोडे उलगडणारे फ्रान्सचे हेन्री बी. कागन आणि जपानचे केन्सो सोई यांना २०२५ चा रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. २००३ चे हे संशोधन आहे. हे कोडे उकलण्यातील पहिला महत्त्वाचा टप्पा कागन यांच्या १९८६ मधील संशोधनातून आला.

आपल्या डाव्या आणि उजव्या हातांच्या आरशातील प्रतिमेसारखे काही रेणू एकसारखे असतात. त्यांना 'कायरेल' रेणू म्हटले जाते. विशेष म्हणजे, सजीवांच्या शरीरातील प्रथिने तयार करणारी अमिनो आम्ले अशा दोन रूपांत अस्तित्वात असली तरी निसर्गात आणि आपल्या पेशींमध्ये त्यापैकी जवळपास केवळ एकाच रूपाचा वापर होतो. मात्र, प्रयोगशाळेत अशाच रेणूंची निर्मिती केली असता दोन्ही रूपे साधारणत: ५०-५० टक्के तयार होतात. जीवनाच्या रसायनशास्त्रात एका रूपाचे वर्चस्व कसे निर्माण झाले असावे, हे रसायनशास्त्रज्ञांसमोरील शंभर वर्षांहून अधिक काळ असलेले कोडे कागन आणि सोई या शास्त्रज्ञांनी उलगडले आहे.



हेन्री बी. कागन आणि केन्सो सोई

कागन आणि सोई यांच्या संशोधनामुळे रेणूंच्या निर्मितीला मिळाली नवी दिशा

या संशोधनाचे महत्त्व औषधनिर्मितीसह अनेक क्षेत्रांत आहे. औषधांच्या रेणूंच्या दोन आरशातील प्रतिमांपैकी एक शरीरावर अपेक्षित परिणाम करू शकते तर दुसरी कमी प्रभावी किंवा काहीवेळा घातक परिणाम करू शकते. त्यामुळे औषधनिर्मितीत विशिष्ट रूपाचा रेणू अचूकपणे तयार करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. कागन आणि सोई यांच्या संशोधनामुळे अशा 'एकाच हाताच्या' रेणूंची निर्मिती करण्यासाठी रसायनशास्त्रज्ञांना नवी दिशा मिळाली आहे.

'नॉन-लिनिअर इफेक्टस् अँड ऑटोकॅटॅलिसिस इन असिमेट्रिक ऑर्गेनिक सिंथेसिस' या संशोधनासाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. हे कोडे उकलण्यातील पहिला महत्त्वाचा टप्पा कागन यांच्या १९८६ मधील संशोधनातून पुढे आला. रासायनिक अभिक्रियेला दिशा देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या 'कॅटॅलिस्ट'मध्ये एका प्रकारच्या रेणूचे प्रमाण थोडे अधिक असेल तर तयार होणाऱ्या उत्पादनातही तितकाच फरक दिसेल, अशी अपेक्षा होती. मात्र, कागन यांनी 'नॉन लिनिअर इफेक्ट' दाखवून दिला. काही परिस्थितींमध्ये सुरुवातीला केवळ थोडेसे अधिक असलेले एक रूप अभिक्रियेनंतर अपेक्षेपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात तयार होऊ शकते. म्हणजेच, रासायनिक प्रक्रियेत छोट्या असमतोलाचे मोठ्या असमतोलात रूपांतर होऊ शकते.

यानंतर केन्सो सोई यांनी हा परिणाम आणखी पुढे नेला. त्यांनी 'ऑटोकॅटॅलिसिस' म्हणजेच स्वउत्प्रेरणावर आधारित अभिक्रियेचा मार्ग दाखवून दिला. या प्रक्रियेत अभिक्रियेत तयार होणारे उत्पादनच पुढील अभिक्रियेसाठी उत्प्रेरकाचे काम करते. सुरुवातीला योगायोगाने एका प्रकारच्या रेणूचे प्रमाण किंचित जास्त तयार झाले तर तेच पुढे त्याच प्रकारच्या अधिक रेणूंच्या निर्मितीला चालना देते. प्रत्येक टप्प्यावर हा फरक वाढत जातो. २००३ मध्ये सोई यांनी अखेरीस अशी अभिक्रिया साध्य केली, ज्यात आरशातील दोन संभाव्य प्रतिमांपैकी केवळ एकाच रूपाची निर्मिती झाली. अशा प्रकारे निसर्गात दिसणाऱ्या 'एकाच हाताच्या' रेणूंची निर्मिती प्रयोगशाळेतही साध्य होऊ शकते, हे सिद्ध झाले.

Pune Edition
Oct 08, 2026 Page No. 02
Powered by: erelego.com

News Paper Clippings During October 2026

Section: Education

आर्थिक संकटावर उपाययोजना; दोघांना नोबेल

एपी, स्टॉकहोम

अमेरिकी अर्थशास्त्रज्ञ रॉबर्ट ई. हॉल आणि मायकेल वूडफोर्ड यांना सोमवारी अर्थशास्त्रातील नोबेल जाहीर झाले. त्यांनी सरकार आणि मध्यवर्ती बँकांना मदत करणाऱ्या प्रारूपांवर जे काम केले, त्याची दखल घेण्यात आली. त्यांच्या या कार्यामुळे ऊर्जासंकट, महागाई यांसारख्या आर्थिक संकटांचे व्यवस्थापन करणे सरकारला सोपे झाले.

'अर्थशास्त्रातील त्यांनी केलेल्या कामामुळे सरकारला धोरणे आखणे सोपे झाले आणि आर्थिक चढ-उतारांचा सामना करता आला. मोठी आर्थिक संकटे पूर्वीपेक्षा अधिक परिणामकारकतेने हाताळता आली. साथीचे आजार आणि नुकतेच उद्भवलेल्या ऊर्जा संकटाच्या काळात त्याचा उपयोग झाला,' असे 'रॉयल स्वीडिश ॲकॅडमी ऑफ सायन्सेस'ने म्हटले आहे.

हॉल हे कॅलिफोर्नियातील स्टॅनफोर्ड विद्यापीठाशी संलग्न असून, वूडफोर्ड हे न्यूयॉर्कमधील कोलंबिया विद्यापीठाशी संलग्न आहेत. ''हा माझा खूप मोठा सन्मान आहे. मला अनपेक्षितपणे मिळालेला हा पुरस्कार आहे,'' अशी प्रतिक्रिया मायकेल वूडफोर्ड यांनी पुरस्कार जाहीर झाल्यावर दिली.

व्यापक पातळीवरील अर्थव्यवस्थेला स्थैर्य आणण्यासाठी सूक्ष्म पातळीवर पाया भक्कम करण्याचे श्रेय रॉबर्ट ई. हॉल आणि मायकेल वूडफोर्ड यांना देण्यात येते.





प्रारूपाचा जगभरात वापर

आर्थिक विज्ञान पुरस्कार समितीचे अध्यक्ष जॉन हॅसलर यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, "दोन्ही शास्त्रज्ञांनी प्रारूपांसाठी सैद्धांतिक पाया आपल्याला दिला आहे. त्याचा वापर जगभरातील मध्यवर्ती बँका आणि सरकारे करीत आहेत. या प्रारूपांमुळे ऊर्जा संकट किंवा कुटुंबांच्या उपभोग्य क्षमतेत अचानक बदल होणे अशा आर्थिक संकटांचा सामना करण्यासाठी आपण आज अधिक तयार आहोत."

Loksatta 13.10.2026

Condolence Message

आपल्या महाविद्यालयातील सेवानिवृत्त सहकारी श्री. विठ्ठल कदम यांचे वृद्धप काळाने दि.२९.१०.२०२६ रोजी दुःखद निधन झाले. ते अनेक वर्ष पतपेढीचे संचालक होते, तसेच फिजिक्स विभागात कार्यरत होते. कैलासवासी विठ्ठल कदम यांना मॉडर्न महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

श्रीराम जय राम जय जय राम...!

श्रीराम जय राम जय जय राम....!

श्रीराम जय राम जय जय राम.....!

Upcoming Events

November 2026

MON	TUE	WE	THU	FRI	SAT	SUN
						1
2	3	4	5	6	7	8
9	10	11	12	13	14 ***Pandit Nehru Jayanti*** 	15***Birsa Munda Jayanti*** 
16	17	18	19 ***Indira Gandhi Jayanti & Rashtriya Ekatmata Din*** 	20	21	22
23	24	25	26 ***Samvidhan Diwas***	27	28	29
30						



Other than the Photos of Modern College Pune-5 and Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.com